# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/06/2023 (सोमवार) दुपार

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन मौदाची कार्यवाही

दिनांक १७/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ कन्हान उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे मौदा हद्दीतील ०१ किमी अंतरावर केसलापूर रोड मौदा येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर ट्राली व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफने टॅक्टर ट्रॉली चालक **आरोपी नामे— अमृत चिंदुजी चामट, वय ५५ वर्ष, रा. वडोदा** हा त्याचे स्वराज ट्रॅक्टर क्र. एम. एच—४० ए— ३२५४ किंमती अंदाजे ४,५०,०००/— रु. व विना परवाना नंबरची लाल रंगाची ट्रॉली किंमती अंदाजे १,००,०००/— रु. व त्यामध्ये एक ब्रास रेती किंमती अंदाजे ३०००/—रु असा एकूण ५,५३,०००/—रुपयाचा मुद्देमाल केसलापूर येथील कन्हान नदीच्या पात्रातून अवैधरित्या चोरी करुन वाहतूक करीत असतांना मिळून आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. हेमंतकुमार खराबे, पोस्टे मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोहवा असलम ब. नं. १७१ मो. क्र. ८६६८८१६०४९ पोस्टे मौदा हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कुही :— अंतर्गत ३० किमी अंतरावर मौजा हळदगाव शिवार येथे दिनांक ०६/०६/२०२३ चे रात्री २४.०० वा. ते दिनांक ०७/०६/२०२३ चे सकाळी ०५.०० वा. दरम्यान मानापुर फार्म हाउसच्या बाधंकामासाठी लागणाऱ्या ८६ लोखंडी जुन्या प्लेटा तरापे व ५ ग्रिल असा एकुण ३८,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनकुसरे पोस्टे कुही हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर